# ट्रेन टू पाकिस्तान

**खुशवंत सिंग**

अनुवाद

**मनीषा सोमण**

**रिया पब्लिकेशन्स्**

६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

Train To Pakistan : Khushwant Singh
Marathi translation by Maneesha Soman
First published in English by Ravi Dayal Publisher, Penguin Books India 2007
Copyright © Ravi Dayal 1988, 2007
First published in Marathi by Riya Publications in arrangement
with Penguin Books India.

**ट्रेन टू पाकिस्तान :** खुशवंत सिंग

अनुवाद : मनीषा सोमण

**प्रकाशक**

रिया पब्लिकेशन्स्,
६७८-ई, शामराव विठ्ठल बँकेच्याशेजारी,
शाहूपुरी दुसरी गल्ली, कोल्हापूर- ४१६००१.
riyapublications@gmail.com
www.ajabgroup.com

**अनुवाद**

मनीषा सोमण
१५/४, कांचन गौरी, पंडित दीनदयाल रोड,
विष्णूनगर, सम्राट हॉटेलजवळ डोंबिवली (वेस्ट) ४२१२०२
मो. नं. : ९८२१२११२९७

**अक्षरजुळणी**

अजब ग्राफिक्स

**मुखपृष्ठ**

चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर

**मुद्रक**

ऋग्वेद प्रिंटर्स, पुणे

**आवृत्ती**

ऑगस्ट २०१६

**किंमत**

₹ २४०/-

# ट्रेन टू पाकिस्तान

माझी मुलगी माला
हिला अर्पण!

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| १. | लूट | ........................................ | ९ |
| २. | कलयुग | ........................................ | ८८ |
| ३. | मनो माजरा | ........................................ | १३१ |
| ४. | कर्म | ........................................ | १५३ |


✦✦✦

# लूट

भारतात दर वर्षी जसा उन्हाळा असतो तसा १९४७ सालचा उन्हाळा नव्हता. त्या वर्षी भारताच्या एकूण हवामानात वेगळेपणा जाणवत होता. नेहमीपेक्षा जास्त उकाडा होता. हवेत कोरडेपणा, धुळीचं प्रमाणही जास्त होतं. उन्हाळा तर संपतच नव्हता. याआधी इतक्या उशिरा पावसाळा सुरू झाल्याचं कोणालाच आठवत नव्हतं. काही आठवडे तर आभाळात नुसतेच विरळ ढग जमा होत होते, पण पावसाचा पत्ता नव्हता. देव आपल्या पापांची शिक्षा देतोय, असं लोक म्हणू लागले होते.

काही लोकांना मात्र आपण पापी आहोत वाटण्यासारखी कारणंही होती. गेल्याच उन्हाळ्यात हिंदूंचं भारत आणि मुस्लिमांचं पाकिस्तान अशी फाळणी होणार असल्याची बातमी पसरल्याने कलकत्त्यात भीषण दंगल उसळली, ज्यात हजारो लोक मारले गेले. मुस्लिमांच्या म्हणण्यानुसार, हिंदूंनी योजना आखून कत्तल करण्यास सुरुवात केली, तर हिंदूंनी याचं खापर मुस्लिमांच्या डोक्यावर फोडलं. काहीही असलं, तरी दोन्ही बाजूंनी हत्या होत होत्या, हे मात्र खरं. दोन्ही बाजूंनी गोळीबार झाले, तलवारी, चाकूंनी भोसकलं गेलं, हाणामारी झाली, लाठ्यांनी मारहाण झाली. दोघांचाही छळ केला गेला. दोन्हीकडे बलात्कार केले गेले. कलकत्त्याला सुरू झालेल्या दंगली उत्तर, पूर्व आणि पश्चिमेकडे – पूर्व बंगालमध्ये नौखालीपर्यंत पसरल्या, जिथे मुस्लिमांनी हिंदूंची कत्तल केली, तर बिहारमध्ये, जिथे हिंदूंनी मुस्लिमांची कत्तल केली. पंजाब आणि सीमावर्ती भागात मुल्ला, कवट्यांनी भरलेल्या पेट्या घेऊन, या बिहारमध्ये मारल्या गेलेल्या मुस्लिमांच्या कवट्या आहेत, असं सांगत फिरत होते. वायव्य सरहद्दीवर अनेक शतके वास्तव्य करून राहणारे हिंदू आणि शीख आपापली घरं सोडून पूर्वेकडे हिंदू आणि शिखांची वस्ती असणाऱ्या भागात आसरा घेण्यासाठी पळाले. बैलगाड्या, ट्रक, ट्रेन्सच्या छतावर किंवा बाजूला लोंबकळून आणि वाहन नाहीच मिळालं तर

पायीच पळून गेले. रस्त्यामध्ये – मग ते नदीचं पात्र ओलांडताना असेल, चौकात किंवा रेल्वे स्थानकावर – त्यांची पश्चिमेकडे आसरा घेण्यासाठी पळून जाणाऱ्या मुस्लिमांच्या लोंढ्याशी गाठ पडत असे. दंगलीनं दाणादाण उडवली होती. १९४७ च्या उन्हाळ्यात जेव्हा पाकिस्तानच्या निर्मितीची औपचारिक घोषणा झाली तेव्हा सुमारे दहा लाख लोक – मुस्लीम आणि हिंदू आणि शीख – पळून जात होते. त्या वेळी पावसाळा सुरू झाला, ज्यात लाखो लोक मृत्युमुखी पडले. संपूर्ण उत्तर हिंदुस्थानच सशस्त्र, भयग्रस्त किंवा भूमिगत झालेला होता. वाळवंटात हिरवळ असावी अशी सीमावर्ती भागापासून सहज न पोहोचता येणारी छोटी छोटी खेडेगावं काय ती शांततेत जगत होती. असंच एक खेडेगाव होतं मनोमाजरा.

मनोमाजरा अगदी छोटंसं खेडं. या गावात तीनच विटांची घरं होती, ज्यातलं एक लाला रामलाल सावकाराचं होतं. इतर दोनपैकी एक गुरुद्वारा होतं तर एक मशीद. पिंपळाभोवती त्रिकोणात या तीन विटांच्या इमारती बांधल्या गेल्या होत्या. मध्ये पिंपळाचं झाड आणि भोवती त्रिकोणात या तीन विटांच्या इमारती. बाकीच्या गावात छोट्या गल्ल्यांच्या तोंडाशी, अंगणाभोवती बुटक्या भिंती असणाऱ्या सपाट छताच्या झोपड्या पुंजक्या पुंजक्यानं उभ्या असलेल्या दिसतात. पुढे या गल्ल्या छोट्या छोट्या होत जात त्यांची पायवाट होते आणि भोवतालच्या शेतात जाऊन लुप्त होते. गावाच्या पश्चिमेकडे बाभळीच्या झाडांनी वेढलेलं तळं आहे. मनोमाजरामध्ये जवळपास ७० कुटुंबं राहतात आणि त्यातलं फक्त रामलालचंच कुटुंब हिंदू आहे. इतर साधारण सारख्या संख्येने शीखांची किंवा मुसलमानांची घरं आहेत. गावाभोवतीची सगळी जमीन शीखांच्या मालकीची असून जमीन कसणारी कुळं मुसलमान आहेत. तिथे काही झाडूवाल्यांची कुटुंबंही आहेत त्यांच्या धर्माबाबत निश्चित माहिती नाही. मुसलमानांच्या मते, ते त्यांच्यातले आहेत, तरीही जेव्हा अमेरिकन मिशनरी मनोमाजरात येतात तेव्हा हे झाडूवाले खाकी सोला टोप्या (इंग्रजांच्या काळात वापरल्या जाणाऱ्या चपट्या टोप्या) घालून त्यांच्या स्त्रियांबरोबर हार्मोनियमच्या सुरात गायल्या जाणाऱ्या भजनांच्या सुरात सूर मिळवतात. कधी कधी ते गुरुद्वारातही जातात. पण मनोमाजरामध्ये एक गोष्ट अशी आहे जिथे लाला रामलालही डोकं टेकतात. ती म्हणजे, तळ्याकाठच्या बाभळीच्या झाडाखालचा तीन फूट उंचीचा दगड. हा स्थानिक देव आहे ज्याची – हिंदू, शीख, मुसलमान